# मुळा नदीकाठच्या वृक्षांची आज गणना

## वृक्षप्रेमींचा पुढाकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> मुळा नदीसुधार प्रकल्प सुरू होणार आहे. त्यासाठी हजारो झाडे तोडली जाणार आहेत. ही झाडे कोणती आहेत, किती आहेत, याची माहिती पालिकेकडे मागितली. ती आतापर्यंत मिळालेली नाही. पालिका फक्त ३५० झाडे बाधित होत असल्याचा दावा करत आहे. या आकडेवारीत तथ्य नाही. त्यामुळे रविवारी शहरातील वृक्षप्रेमी आणि वृक्षांची माहिती असलेले तज्ज्ञ चार तास झाडांची संख्या, कोणत्या जातीची झाडे याची सर्व माहिती घेणार आहेत. नदीकाठची जैवविविधता वाचविण्यासाठी आमचा लढा आहे.
>
> \- प्रशांत राऊळ, वृक्षप्रेमी

**पिंपरी :** मुळा नदीसुधार प्रकल्पात नदीकाठच्या एक हजार झाडांपैकी ३५० झाडे बाधित होत असल्याचा महापालिकेने दावा केला आहे. मात्र, त्यापेक्षा जास्त झाडांवर कुऱ्हाड पडणार असल्याचा दावा करत शहरातील वृक्षप्रेमी नागरिक आज (रविवारी) मुळा नदीकाठी पहाटे सहा ते १० या चार तासांत झाडांची संख्या आणि कोणत्या जातीची झाडे आहेत, याची सर्व माहिती घेणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका मुळा नदीच्या एका बाजूने पुनरुज्जीवन प्रकल्प राबवत आहे. वाकड बायपास ते स्पायसर कॉलेज-सांगवी पूल असे ८.८० किलोमीटर अंतराच्या या कामासाठी २७६ कोटी ५४ लाख खर्च होणार आहे. हे काम लवकरच सुरू केले जाणार आहे. या काठावर अनेक जुनी, दुर्मिळ झाडे व वनस्पती आहेत. सन २०१८च्या वृक्षगणनेत या काठावर विविध जातींच्या एकूण एक हजार लहान व मोठ्या झाडांचा समावेश आहे. त्यातील सुमारे ३०० झाडे विदेशी आहेत. ती काढून देशी झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच, कामास बाधित होणारी सुमारे ३५० झाडे काढून त्यांचे काठावरच इतरत्र पुनर्रोपण करण्याचा दावा पालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.